महाराष्ट्र शासन
परिवहन आयुक्त कार्यालय
५ वा मजला, फाऊंटन दूरसंचार भवन-२,
महात्मागांधी रोड, फाऊंटन, मुंबई ४०० ००१.

क्र. पआाका/का-३/कोविड-१९ /करमाफी(कंत्राटीवाहने)/६६/२०२०/जा.क्र. 11020 दि. 03/12/2020

प्रति,
सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालय.

विषय :- कोविड-१९ या विषाणूव्दारे उद्‌भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमुळे वार्षिक कर भरणाऱ्या सर्व प्रकारच्या परिवहन वाहनांना कर माफी देणेबाबत.

संदर्भ :- १. शासन अधिसूचना क्र.एमव्हीडी-०६२०/प्र.क्र.७२/परि-३, दि.१५.०९.२०२०.
२. शासन अधिसूचना क्र.एमव्हीडी-०६२०/प्र.क्र.७२/परि-३, दि.३०.०९.२०२०.
३. शासन परिपत्रक क्र.एमव्हीडी-०६२०/प्र.क्र.७२/परि-३, दि.०४.११.२०२०.

कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावामुळे केंद्र शासनाने दि.२५.०३.२०२० पासून संपूर्ण देशामध्ये टाळेबंदी लागू केली आणि महाराष्ट्र राज्यात नोंदणीकृत झालेल्या आणि वार्षिक कर भरणा करणाऱ्या परिवहन वाहनांना, ज्यांनी दि.३१.०३.२०२० पर्यंतचा कर भरणे आवश्यक होते, अशा परिवहन संवर्गातील वाहन मालकांना दिलासा देणे आवश्यक होते.

महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमाच्या (१९५८ चा ६५) कलम १३ चे उपकलम (२) मधील तरतूदींन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासन, यांनी उपरोक्त संदर्भ १ नुसार वार्षिक कर भरणा करणारी मालवाहतूक करणारी वाहने, प्रवासी वाहने, खनित्रे, खाजगी सेवा वाहने, व्यवसायिक कँपर्स व्हॅन, शालेय विद्यार्थी बस इत्यादी वाहनांना दि.०१.०३.२०२० ते ३१.०३.२०२१ या कालावधी करिता जर दि.३१.०३.२०२० पर्यंत कर भरला असल्यास त्यास ५०% करातून सूट देण्यात येत आहे.

शासन अधिसूचना दि.१५.०९.२०२० व ३०.०९.२०२० नुसार राष्ट्रीय सूचना केंद्र यांनी विकसित केलेल्या वाहन प्रणालीमध्ये या नुसार आवश्यक ते बदल केलेले आहेत. नव्याने जारी केलेल्या दि.०४.११.२०२० रोजीच्या परिपत्रकानुसार ज्यांनी दि.३१.०३.२०२० पर्यंत कर भरलेला आहे किंवा जे वाहन मालक त्यांच्या वाहनाचा दि.३१.०३.२०२० पर्यंत थकित असलेला कर दंड व्याजासहित दि.३१.१२.२०२० पर्यंत भरतील अशा वाहनांना दि.०१.०४.२०२० ते ३०.०९.२०२० या कालावधीकरिता १००% सूट म्हणजेच दि.०१.०४.२०२० ते ३१.०३.२०२१ या वर्षासाठी एकूण वार्षिक कराच्या ५०% सूट



Scanned with CamScanner

देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे वाहन धारकाने एप्रिल २०२० ते सप्टेंबर २०२० या कालावधीचा कर भरला असल्यास तो पुढील कालावधीकरीता म्हणजे ऑक्टोबर २०२० ते मार्च २०२१ या कालावधीसाठी देय करात समायोजित करण्यात आले आहे. तसेच, जे वाहन मालक थकित कर दि.३१.१२.२०२० पर्यंत दंड व्याजासहित भरण्यास तयार असतील त्यांनाही उपरोक्त सवलतीचा लाभ घेता येईल.

या सुधारित शासन परिपत्रकानुसार / अधिसूचनेनुसार वाहन प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात आले असून दि.३१.०३.२०२० पर्यंत कर भरणा करणाऱ्या वाहनांना सद्यस्थितीमध्ये कराच्या ५०% आकारणी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे ज्यांनी दि.०१.०४.२०२० ते ३०.०९.२०२० या कालावधीचा कर भरणा केला आहे. अशा वाहनांचा कर समायोजित करण्यात आलेला असून कर कालावधी पुढे करण्यात आला आहे. या अधिसूचनेनुसार पुर्णत: फायदा मिळण्याकरिता जे वाहन मालक दि.३१.१२.२०२० पुर्वी दि.३१.०३.२०२० पर्यंतचा कर भरणार आहेत अशा वाहन धारकांना या अधिसूचनेव्दारे योग्यप्रकारे सूट मिळण्याकरिता वाहन प्रणालीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

१. अशा वाहनांना कर भरण्याची सुविधा फक्त परिवहन कार्यालयामध्ये ठेवण्यात आली आहे.

२. अशा वाहनांचा कर जर दि.३१.१२.२०२० पर्यंत भरणा केला तर दि.३१.०३.२०२० पर्यंतचा कर रोखपालाकडे स्विकारण्यात यावेत व दि.०१.०४.२०२० ते दि.३०.०९.२०२० पर्यंत करमाफी (Tax Clearance)संबंधित कार्यालयातून देण्यात यावी.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(अविनाश ढाकणे)
परिवहन आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
3/12



Scanned with CamScanner